3 र्‍या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार


खिंचो न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक
• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४५६ वा • गुरूवार, ता. २७ नोव्हेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

ईश्वर टी ॲण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव
सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

अर्थव्यवस्थेसमोर नवे संकट

# आयएमएफची भारताला 'क्रॉलिंग पेग'ची लालकार्ड चेतावणी

## भारतीय रुपयावर वाढलेली अस्थिरता



**नवी दिल्ली । रयत समाचार**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ) लवकरच भारताच्या परकीय चलन विनिमय व्यवस्थेचे पुनर्वर्गीकरण करून तिला 'क्रॉलिंग पेग' या श्रेणीत ठेवणार असल्याची गंभीर माहिती ब्लूमबर्ग आणि रॉयटर्सने दिली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) याला नोंदवलेला तीव्र विरोधही आयएमएफने दुर्लक्षित केल्याची चर्चा असून त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेसमोर नवे धोक्याचे संकेत निर्माण झाले आहेत.

**क्रॉलिंग पेग म्हणजे काय?**

ज्या चलनाची किंमत सातत्याने घसरत राहते आणि ज्याची विनिमय दराची पायरी पायरीने घसरण आयएमएफकडून निश्चित केली जाते, त्या चलनांना क्रॉलिंग पेग करन्सी म्हणतात. या श्रेणीत सध्या फक्त अर्जेंटिना पेसो आणि बांगलादेशी टका यांचा समावेश आहे. आता भारताचा रुपया या यादीत सामील होण्याच्या उंबरठ्यावर असल्याची परिस्थिती अधिकच चिंताजनक आहे.

**रुपयाची ऐतिहासिक घसरण गुंतवणूकदारांमध्ये वाढली चिंता**

डॉलरच्या तुलनेत रुपयाची सातत्याने घसरत चाललेली किंमत, परकीय चलन भांडारावरील ताण आणि आर्थिक निर्देशकांतील कमकुवतपणा यामुळे आयएमएफ ही कठोर पावले उचलणार असल्याचे सांगितले जात आहे. या निर्णयाचा परिणाम काय होऊ शकतो हे पहा. भांडवल बाहेर जाण्याची भीती वाढेल. विदेशी गुंतवणूक कमी होऊ शकते. निर्यातदारांना कमी दर मिळतील. आयात महाग होणार असल्याने उद्योगांवर मोठा परिणाम. रुपयावर सातत्याने दबाव निर्माण होऊ शकतो.

**२०२३ पर्यंत फ्लोटिंग, मग स्थिर... आणि आता पुन्हा संकटात!**

नोटबंदी, वारंवार बदलणारे जीएसटी नियम आणि राजकीय प्राधान्यांमध्ये आर्थिक धोरणे दुय्यम ठेवल्याचा आरोप करत अनेक तज्ज्ञांनी पूर्वीच इशारे दिले होते. २०२३ पर्यंत भारताची मुद्रा फ्लोटिंग श्रेणीत होती; त्यानंतर काही काळ ती स्थिर श्रेणीत गेली. परंतु आता पुन्हा एकदा आयएमएफच्या 'नजरेत येत आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा**

जर आयएमएफने प्रत्यक्षात भारताला क्रॉलिंग पेग श्रेणीत टाकले, तर रुपयाची घसरण दीर्घकाळ थांबणार नाही. महागाईचा दबाव वाढू शकतो. व्यापार तुटीचा फुगा अधिक फुगेल. आर्थिक धोरणकर्त्यांवर तातडीच्या सुधारणा करण्याचा दबाव वाढेल.

**सरकार आणि आरबीआयसमोर मोठे आव्हान**

अर्थव्यवस्थेला स्थिर करण्यासाठी सशक्त सुधारणा, गुंतवणुकीला पोषक वातावरण आणि दीर्घकालीन चलन स्थैर्याच्या नीति तयार करणे अत्यावश्यक आहे. तज्ज्ञांच्या मते, अशा उपाययोजना वेळेत राबवल्या असत्या तर रुपयाची इतकी दुर्दशा झाली नसती.

भारतीय रुपयाच्या ऐतिहासिक घसरणीच्या पार्श्वभूमीवर आयएमएफची ही 'क्रॉलिंग पेग' चेतावणी म्हणजे राष्ट्राच्या आर्थिक आरोग्यासाठी गंभीर इशारा मानला जात आहे.

# युनेस्को मुख्यालयात संविधानदिनी डॉ.आंबेडकरांचा पुतळाउभारला

## भारताचा मान उंचावणारा ऐतिहासिक क्षण



**पॅरिस । रयत समाचार**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण युनेस्कोच्या पॅरिसमधील मुख्यालयात संविधान दिनी अतिशय दिमाखात करण्यात आले. महाराष्ट्र शासनाने साकारलेल्या या पुतळ्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचा मान अभिमानाने उंचावला आहे. युनेस्कोच्या मुख्यालय प्रांगणात जागतिक समुदायाच्या उपस्थितीत उभारलेला हा पुतळा भारतीय संविधानाच्या महान परंपरेचे प्रतीक ठरला आहे.

युनेस्कोचे महासंचालक खालिद अल-इनाय यांच्या हस्ते या पुतळ्याचे अनावरण झाले. यावेळी भारताचे युनेस्कोतील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पॅरिसच्या मध्यवर्ती भागात झालेल्या या सोहळ्याने भारतीय संस्कृती, लोकशाही मूल्ये आणि सामाजिक न्यायाच्या विचारांची आंतरराष्ट्रीय स्तरावर पुनःप्रस्थापना झाली.

या अनावरण सोहळ्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय संविधानाच्या मूल्यांची पुन्हा एकदा भव्य नोंद झाली असून, भारताच्या लोकशाही विचारांचा गौरव संपूर्ण जगात झळकला आहे.

# आयआयटी बॉम्बेचं नाव मुंबई करण्यासाठी फडणवीसांकडून पत्र

**मुंबई । रयत समाचार**

बॉम्बे नाही, आमच्यासाठी ते मुंबईच! आयआयटी बॉम्बेचं नाव आयआयटी मुंबई करण्यात यावं, यासाठी मी स्वतः पंतप्रधान आणि मानव संसाधन विकास मंत्र्यांना पत्र लिहिणार आहे,'' असे ठाम निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केले.

# फायनल नेहमी अहमदाबादलाच का? मुंबईचे महत्व कमी करण्याचा घाट

## आदित्य ठाकरे टी२० विश्वचषकावर भडकले



**मुंबई । रयत समाचार**

टी२० विश्वचषक २०२६ स्पर्धेच्या वेळापत्रकात अंतिम सामना ८ मार्च रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवण्याचा निर्णय जाहीर होताच राजकीय आणि क्रीडा वर्तुळात मोठ्या चर्चा सुरू झाल्या. युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी या निर्णयावर जोरदार टीका करत प्रश्न उपस्थित केला ''प्रत्येक फायनल सामना अहमदाबादलाच का? मुंबई, कोलकाता किंवा चेन्नई यांना हा सन्मान का दिला जात नाही?''

आदित्य ठाकरे यांनी सोशल मीडियावरून थेट ICC आणि BCCI वर निशाणा साधला. ते म्हणाले की मुंबई, कोलकाता, चेन्नई आणि मोहालीची ऐतिहासिक क्रिकेट पार्श्वभूमी जगभर ओळखली जाते. मुंबईत क्रिकेटचा जन्म झाला, क्रिकेटचं 'लॉर्ड ऑफ आशिया' समजलं जाणारं वानखेडे स्टेडियम असताना, प्रत्येक महत्त्वाचा सामना अहमदाबादला दिला जातोय. हा निर्णय केवळ क्रिकेटमधला नसून काही प्रमाणात राजकीय छटा असलेला वाटतो.

आयसीसीने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार भारत आणि पाकिस्तान यांच्यातील थरारक सामना १५ फेब्रुवारीला कोलंबो (श्रीलंका) येथे खेळवला जाणार आहे. उपांत्य सामने मुंबई आणि कोलकाता/कोलंबो येथे होतील; पण अंतिम सामना मात्र अहमदाबादलाच. याबाबत ठाकरे म्हणाले,ICC ने पक्षपाती भूमिका न घेता पारदर्शी आणि ऐतिहासिक परंपरेला न्याय देणारे निर्णय घ्यायला हवेत.''

भारतीय क्रिकेट चाहत्यांमध्येही या निर्णयाबाबत तीव्र प्रतिक्रिया दिसत आहेत. अनेकांनी मुंबई, कोलकाता वा चेन्नईला फायनल यजमानपद मिळायला हवे होते, अशी भावना व्यक्त केली आहे.

**विश्वचषकाचे गट**

गट अ : भारत, पाकिस्तान, यूएसए, नेदरलँड्स, नामिबिया
गट ब : ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, झिम्बाब्वे, आयर्लंड, ओमान
गट क : इंग्लंड, वेस्ट इंडिज, बांगलादेश, नेपाल, इटली
गट ड : दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड, अफगाणिस्तान, कॅनडा, यूएई

# देशातील पहिल्या एआय फिल्म फेस्टिव्हलचे उद्घाटन

## १८ देशांमधून ६८ चित्रपटांची नोंदणी; २७ चित्रपटांची निवड

**पणजी । प्रभाकर**

ढगे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आणि WAVES फिल्म बाजार यांनी LTIMindtree च्या सहकार्याने ५६व्या महोत्सवात भारताचा पहिला AI Film Festival आणि Cinema AI Hackathon सुरू केला. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने निर्मिती होत असलेल्या नव्या पिढीच्या सिनेमाचे प्रदर्शन करण्याचा हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला.या विशेष फ स्टिव्हलसाठी १८ देशांतील ६८ चित्रपट, तसेच Adobe Max, AI Film3 (USA), Burano AI (Italy), Metamorph AI (UK), Omni Film Festival (Australia) या पाच आंतरराष्ट्रीय एआय फिल्म फेस्टिव्हलमधील पुरस्कारप्राप्त चित्रपटांची निवड करण्यात आली. याशिवाय १४ स्वतंत्र चित्रपटकर्त्यांचाही यात समावेश होता.या चित्रपटांमधून २७ चित्रपट स्पर्धा विभागासाठी तर ४ चित्रपट अव्यावसायिक प्रदर्शनासाठी निवडले गेले. निवड प्रक्रियेत कथनशैली, तांत्रिक नावीन्य आणि भावनिक अभिव्यक्तीचे निकष विचारात घेण्यात आले.

WAVES Film Bazaar च्या समारोप सोहळ्यात विजेत्यांची घोषणा करण्यात आली ती अशी

द क्राफ्ट मास्टर अवॉर्ड
सर्वोत्तम एआय लघुपट
(₹३,००,०००)





चित्रपट : Nagori
दिग्दर्शक : गिलॉम हर्बॉल्ट (फ्रान्स)
कथनशैली, सादरीकरण आणि भावनात्मक परिणामकारकतेसाठी हा चित्रपट सर्वोत्तम ठरला.

द क्राफ्ट व्हॅनगार्ड अवॉर्ड
सर्वात नाविन्यपूर्ण एआय वापर / प्रयोगशील कथा
(₹२,००,०००)
चित्रपट : The Cinema That Never Was
दिग्दर्शक : मार्क वॉखोल्झ (जर्मनी)
धाडसी प्रयोगशीलता आणि एआय तंत्रज्ञानाच्या अभिनव सादरीकरणासाठी हा सन्मान.

द क्राफ्ट स्पेक्ट्रा अवॉर्ड सर्वोत्तम एआय ॲनिमेशन / व्हिज्युअल डिझाइन
(₹१,००,०००)
चित्रपट : Kyra
दिग्दर्शक : Meta Puppet (अमेरिका)
एआय च्या साहाय्याने उत्कृष्ट दृश्यरचना आणि तांत्रिक कल्पकता दाखविल्याबद्दल पुरस्कार.

ज्युरी स्पेशल मेंशन
The Last Backup Final Par
श्रीरिथान्या एम. (इंग्रजी)
Miracle on Kachua Beach
शिवांशु निरुपम (हिंदी)
या दोन्ही चित्रपटांतील एआय आधारित सर्जनशील कामगिरीला विशेष दाद.

एआय चित्रपटांचे सार्वजनिक प्रक्षेपण २६ नोव्हेंबर रोजी दुपारी २:३० वाजता माक्विनेज पॅलेस, ऑडी १ येथे तर २७ नोव्हेंबर रोजी सायं. ४:४५ वाजता INOX पोरवोरिम, ऑडी ४ येथे होईल.

१९५२ मध्ये सुरू झालेला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा दक्षिण आशियातील सर्वात मोठा आणि प्रतिष्ठित महोत्सव मानला जातो.NFDC केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालय आणि गोवा शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित होणारा हा सोहळा जगभरातील कलाकार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ आणि सिनेमाविश्वातील तज्ज्ञांना एकत्र आणतो. गोव्याच्या नयनरम्य किनाऱ्यांच्या साक्षीने २० ते २८ नोव्हेंबरदरम्यान होत असलेल्या ५६व्या आवृत्तीत जगभरातील भाषांचे, संस्कृतींचे, प्रयोगशीलतेचे आणि नावीन्यपूर्ण सिनेमाचे सादरीकरण होत आहे.

# कामगार कायद्यातील बदलांविरोधात आयटकचे आंदोलन

## बांद्रा कामगार भवनात संविधानदिनी जोरदार निदर्शने





**मुंबई । रयत समाचार**

केंद्र सरकारने प्रस्तावित केलेल्या कामगार कायद्यातील बदलांविरोधात आज आयटक तर्फे बांद्रा येथील कामगार भवनात संविधान दिनी संतप्त निदर्शने करण्यात आली, अशी माहिती कॉम्रेड प्रकाश रेड्डी यांनी दिली. यावेळी आयटकचे कार्यकर्ते, विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधी आणि घरकामगार महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कॉम्रेड रेड्डी यांनी माहिती दिली की, निदर्शनादरम्यान सहाय्यक कामगार आयुक्त अशोक बिहर स्वतः खाली येऊन आंदोलकांकडून निवेदन स्वीकारले. हे निवेदन केंद्र सरकारकडे पाठवण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच घर कामगार मोलकरणी संघटनेने स्थानिक प्रलंबित प्रश्नांबाबत स्वतंत्र निवेदन सादर केले असून त्या अनुषंगाने संयुक्त बैठक घेण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिले.

आयटक आणि कामगार संघटना संयुक्त कृती समितीने स्पष्ट केले की कामगारविरोधी कायदे मागे घेण्यासाठीचा संघर्ष आणखी तीव्र करण्यात येणार आहे. आंदोलनस्थळी ''लाल झेंडा झिंदाबाद'' ''संविधान चिरायु होवो'' अशा घोषणांनी वातावरण दणाणून गेले.

कामगारांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी आयटकने संविधान दिनी घेतलेली ही लढाऊ भूमिका आगामी काळातील संघर्षाची दिशा ठरवणारी ठरणार आहे.

# 'तपोवन वाचवा' नाशिककरांचा जोरदार आवाज

**नाशिक । रयत समाचार**

नाशिककरांच्या 'तपोवन वाचवा' आंदोलनाला मोठा जोर मिळत असून सामाजिक कार्यकर्ते राजू देसले यांनी नागरिकांना आपला पाठिंबा ठोसपणे नोंदवण्यासाठी एक खास आवाहन केले आहे. ज्यांना तपोवन वाचवा चळवळीला पाठिंबा द्यायचा आहे, त्यांनी हा फोटो आपल्या डीपी किंवा स्टेटसवर त्वरित ठेवावा, असे आवाहन देसले यांनी केले. देसले पुढे म्हणाले, आज संपूर्ण नाशिक शहरात हा हाच फोटो दिसला पाहिजे. प्रशासनालादेखील कळू द्या की नाशिककर किती मोठ्या संख्येने तपोवन रक्षणासाठी उभे आहेत.






या आवाहनाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून सकाळपासून सोशल मीडियावर 'तपोवन वाचवा'चे पोस्टर, डीपी आणि स्टेटस मोठ्या प्रमाणावर दिसू लागले आहेत. युवक, पर्यावरणप्रेमी, महिला बचत गट, विविध सामाजिक संस्था यांच्यासह सर्वसामान्य नाशिककर एकजूट दाखवत आहेत.

तपोवन परिसरातील पर्यावरण संवर्धनाचा प्रश्न गेल्या काही दिवसांत चांगलाच तापला असून या आंदोलनातून शहराच्या हिरवाईवर गदा आणणाऱ्या निर्णयांना ठोस विरोध दर्शवला जात आहे. सोशल मीडियावर सुरू झालेल्या जनआंदोलनामुळे प्रशासनासमोर नागरिकांच्या नाराजीचे स्पष्ट चित्र उमटत असून पुढील काही दिवसांत या मोहिमेला आणखी मोठा जनसमर्थन मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# २७ नोव्हेंबरला घाशीराम कोतवाल चित्रपटाची विशेष स्क्रीनिंग रिगल सिनेमात





**मुंबई । रयत समाचार**

मराठी नाट्य-चित्रपट सृष्टीतील महत्त्वाचा ठेवा मानला जाणारा ''घाशीराम कोतवाल'' (१९७७) या चित्रपटाची विशेष स्क्रीनिंग येत्या गुरुवारी, २७ नोव्हेंबर रोजी दुपारी ३:३० वाजता रिगल सिनेमा, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे. या विशेष प्रदर्शनाची ओळख सुप्रसिद्ध दिग्दर्शक के. हरिहरन करून देणार आहेत.

विजय तेंडुलकर लिखित प्रसिद्ध नाटकावर आधारित हा चित्रपट पेशवाईच्या उदयअस्ताचा इतिहास प्रभावीपणे उलगडतो. या चित्रपटाची ३५ मि.मी. प्रिंट जर्मन उपशीर्षकांसह आर्सेनल संस्थेकडे वितरणासाठी जतन करण्यात आली होती. हीच प्रिंट उपलब्ध असलेली दुर्मिळ प्रत असल्याने तिच्यावरून २०१३ मध्ये चित्रपटाचे पुनर्संचयन करण्यात आले.

ही स्क्रीनिंग 'आर्सेनल ऑन लोकेशन' कार्यक्रमाचा भाग असून गोएथे-इन्स्टिट्यूट/मॅक्स म्युलर भवन मुंबई आणि .. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे.

ही स्क्रीनिंग सर्वांसाठी खुली असून आसनव्यवस्था प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर असेल. प्रवेशद्वार दुपारी ३:३० वाजता बंद करण्यात येणार असून उशिरा येणाऱ्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

# भारतीय बौद्ध महासभेची संविधान रक्षणाची शपथ



**अहमदनगर । रयत समाचार**

भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगर दक्षिणच्या वतीने संविधान दिन मोठ्या उत्साहात व श्रद्धाभावाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पदाधिकाऱ्यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आणि त्यानंतर संविधान रक्षणाची शपथ घेण्यात आली.

या प्रसंगी जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, जिल्हा संस्कार उपाध्यक्ष भगवंत गायकवाड, जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष संतोष गायकवाड, सचिव किशोर कांबळे, सचिव गोरख केदारे, रवींद्र कांबळे, शहराध्यक्ष दीपक पाटोळे, सरचिटणीस गौतम पाचारणे, तालुका अध्यक्ष नितीन साळवे, तसेच अमोल गायकवाड, सुनील पंचमुख, अविनाश राक्षे, राहुल पंडागळे, शशिकांत घोडके, बापू भिंगारदिवे, विजय पाटोळे, परमेश्वर गायकवाड, कचरू थोरात, चिमाजी साळवे, मोहन शिरसाट, आशा भिंगारदिवे, उषा खंडागळे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुष्पहार अर्पणानंतर समता सैनिक दलाच्या वतीने उपाध्यक्ष संतोष गायकवाड यांच्या नेतृत्वात जनरल सलामी देण्यात आली. त्यानंतर संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करून सर्व उपस्थितांनी स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुत्व या भारतीय संविधानाच्या मुलभूत मूल्यांचे रक्षण करण्याची सामूहिक शपथ घेतली.

कार्यक्रमात आयुष्यमान जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे म्हणाले, ''संविधानाचा आदर करणे आणि त्याचे रक्षण करणे ही प्रत्येक भारतीयाची कर्तव्य आणि जबाबदारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करून समाजाला प्रगत दिशेने नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.''

जिल्हा संस्कार उपाध्यक्ष भगवंतराव गायकवाड यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले, ''भारतीय संविधानाने संपूर्ण देशाला एका सूत्रात बांधले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घडवलेला हा दस्तऐवज समानता आणि लोकशाहीची भक्कम पायाभरणी करणारा आहे. त्यांच्या परिश्रमांची आठवण ठेवणे आपले कर्तव्य आहे.''

संविधान दिनाचा हा उपक्रम सामाजिक जागृती वाढवणारा आणि संविधानिक मूल्यांच्या प्रसाराला बळ देणारा ठरला.

## फोल्ड गणित : भारतातून उदयास आलेली नवी गणितशाखा

# संशोधक प्रमोद जाधव यांचे अभिनव संशोधन

**अहमदनगर । आबिद खान**

फोल्ड गणित ही भारतातून उदयास आलेली नवी गणितशाखा महाराष्ट्रातील स्वतंत्र संशोधक प्रमोद श्रीधर जाधव यांनी विकसित केली असून, तिच्याकडे देश-विदेशातील वैज्ञानिक व संशोधकांचे लक्ष वेधले जात आहे. पारंपरिक गणितातील विरोधाभासांना अपूर्णता न मानता उलट नवीन ज्ञाननिर्मितीचे स्रोत म्हणून स्वीकारणारी ही प्रणाली ''नव्या प्रकारचे गणन-विभाग'' म्हणून उल्लेखनीय ठरत आहे. स्वतंत्र घोषणा (अक्षय), नवीन तर्कपद्धती आणि स्वनिर्मित गणितीय क्रियांवर आधारित ही प्रणाली मानवी मेंदूप्रमाणे



बहुस्तरीय विचारक्षमतेची संगणकीय पातळीवर निर्मिती करण्याची नवी दिशा सुचवते, असे संशोधक जाधव यांचे मत आहे. फोल्ड गणिताचे उपयोग केवळ गणितात मर्यादित नसून विश्वशास्त्रालाही ती नवे दालन उघडते. विश्वातील फोल्डसंरचना, ऊर्जा-वितरण आणि अवकाशकालातील बदलांचे नवे स्वरूप मांडणे, गूढ ऊर्जा आणि गूढ पदार्थ यांची विरोधाभास-आधारित व्याख्या करणे, विश्वाच्या अतिजलद प्रसरणाला फोल्ड-परिवर्तनाचा टप्पा म्हणून नवे विवेचन देणे आणि अनेक विश्वांची निर्मिती कशी घडते याचे प्रतीकात्मक नकाशे तयार करणे या महत्त्वपूर्ण संकल्पना फोल्ड गणितातून पुढे येत आहेत. विश्वशास्त्रात या आधारे पुढील संशोधनासाठी नवे मार्ग खुल्या होत असल्याचे प्राथमिक निष्कर्ष निघत आहेत.

या नव्या गणितशाखेचा विस्तार अनेक प्रगत विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रांत होऊ शकतो. कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये विरोधाभासांचे सूक्ष्म विश्लेषण करून निर्णयक्षमता वाढविणे, क्वांटम गणनशास्त्रात फोल्ड अवस्थांचे विश्लेषण, अंतराळ संशोधनात अवकाशीय फोल्ड-रचना समजणे, नॅनो-उपचारपद्धतीत पेशीस्तरावरील फोल्ड-बदलांचे नियंत्रण, चित्र व माहिती संक्षेपात साठवणक्षमता वाढवणे, तर सुरक्षा क्षेत्रात विरोधाभास-आधारित प्रगत गुप्तलेखन तंत्र विकसित करणे अशा अनेक प्रत्यक्ष उपयोगक्षेत्रांत फोल्ड गणित उपयुक्त ठरू शकते.

या गणितशाखेचे सखोल मूल्यांकन आणि पुढील उभारणी भारतातच व्हावी, यासाठी भारतीय तंत्रसंस्था, भारतीय विज्ञान संस्था, टाटा मूलभूत संशोधन संस्था, आंतरविश्वशास्त्र केंद्र तसेच अंतराळ व संरक्षण संशोधन संस्थांनी संयुक्त संशोधन, परीक्षण आणि प्रयोगात्मक प्रकल्प राबवावेत, अशी विनंती संशोधक प्रमोद जाधव यांनी केली आहे. भारतीय शैक्षणिक संस्था या नव्या शाखेकडे गांभीर्याने पाहिल्यास पुढील दशकात भारत जागतिक संशोधनाला नवी दिशा देऊ शकेल, असे ते म्हणाले. अधिक माहितीसाठी ९२७२०७९८६९ व ८३२९३९४१२५ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आनंद विद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

# भव्य रॅली व उद्देशिकेचे सामूहिक वाचन



**अहमदनगर । रयत समाचार**

गुलमोहर रोड येथील आनंद विद्यालयात बुधवार ता.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दिवसाची सुरुवात भव्य दिव्य अशा रॅलीने झाली. विद्यार्थ्यांनी हातात संविधान जनजागृती फलक, घोषवाक्ये आणि तिरंगा घेऊन परिसरात जागरूकता संदेश दिला.

कार्यक्रमात संविधान दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. त्यानंतर सर्व शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी यांनी सामुहिकपणे संविधान उद्देशिकेचे वाचन करून लोकशाही मूल्यांची पुनःस्थापना करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव किसन तरटे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्रीकांत अष्टेकर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शारदा पोखरकर तसेच श्री. हंबर्डे, विकास घोलप, विकास माने,श्री. जाधव, श्रीमती परदेशी आणि श्रीमती जोशी यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टेंभी खंडोबा यात्रा मानाच्या काठीची मिरवणूक उत्साहात

## चंपाषष्ठी उत्सवानिमित्त भाविकांची मोठी गर्दी



**नगर तालुका । रयत समाचार**

नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील टेंभी डोंगरावरील शिव मल्हार गडावर चंपाषष्ठी निमित्त पारंपरिक उत्साहात यात्रा साजरी करण्यात आली. जय मल्हार सेवेकरी मंडळाच्या युवकांनी प्रवरासंगम येथून कावड आणून खंडोबा देवाची जलाभिषेक पूजा केल्यानंतर यात्रेला सुरुवात झाली.

जलाभिषेकानंतर गावातून मानाच्या काठीची सवाद्य भव्य मिरवणूक काढण्यात आली. टेंभी डोंगरावर सकाळपासून यात्रेला उपस्थित असलेले खंडोबा देवस्थानचे विश्वस्त, जय मल्हार मंडळाचे सेवेकरी आणि भक्तगण यांनी मानाची काठी पिंपळगावात आणली. त्यानंतर गावातील सर्व मंदिरांसमोर मानाच्या काठीची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

टेंभी खंडोबा शिव मल्हार गडावर चंपाषष्ठीनिमित्त भाविकांची मोठी गर्दी होऊन दर्शनासाठी रांगा लागत असल्याचे दृश्य पाहायला मिळाले.

## विष्णू भूतकर यांना मातृशोक

# द्वारकाबाई भूतकर यांचे निधन



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

बालिकाश्रम रोडवरील भूतकरवाडी परिसरातील ज्येष्ठ नागरिक द्वारकाबाई बाजीराव भूतकर वय ७५ यांचे बुधवार, ता. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. दिवंगत द्वारकाबाई यांच्यावर नालेगाव अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. झोपडी कॅन्टीन येथील हॉटेल व्यावसायिक विष्णू भूतकर यांच्या त्या मातोश्री होत.

## कौशल्य विकासातून महिलांचे सशक्तीकरण; जन शिक्षण संस्थेचा उपक्रम

# महिलांसाठी शिवणकाम व पार्लर प्रशिक्षण शिबिर

**अहमदनगर । रयत समाचार**

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयांतर्गत कार्यरत जन शिक्षण संस्था व प्रणिती फॅशन अँड पार्लर यांच्या वतीने संविधान दिनानिमित्त बोल्हेगाव येथे महिलांसाठी शिवणकाम व ब्युटी पार्लर प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमाला बोल्हेगाव व परिसरातील महिला आणि युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला



कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांसह उपस्थित महिलांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून सार्वजनिक स्वच्छतेची शपथ घेतली. या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन जन शिक्षण संस्थेचे संचालक बाळासाहेब पवार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास कार्यक्रम अधिकारी शफाकत सय्यद, अनिल तांदळे, मनीषा शिंपी, पूजा शिंपी, सचिन शिंपी, विजय बर्वे आदींसह मोठ्या संख्येने महिला व युवती उपस्थित होत्या. आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, शिबिरात शिवणकाम, ब्युटी पार्लरचे व्यावसायिक प्रशिक्षण, ग्रुमिंग, स्व-रोजगार तंत्रे, लघुउद्योग उभारणीचे मार्गदर्शन यांसारख्या अनेक कौशल्यांचा समावेश आहे.

उद्घाटनपर भाषणात बाळासाहेब पवार म्हणाले, ''भारतीय संविधानाने स्त्री-पुरुष समानतेचा अधिकार दिला आहे. महिलांनी आर्थिक सक्षमतेकडे वाटचाल करणे हीच संविधान दिनाची खरी प्रेरणा आहे. शिवणकाम, फॅशन डिझायनिंग आणि ब्युटी पार्लर क्षेत्रात महिलांसाठी आज प्रचंड संधी उपलब्ध आहेत.'' शिबिरात मनीषा शिंपी व पूजा शिंपी महिलांना शिवणकाम व ब्युटी पार्लरचे सखोल, व्यावसायिक प्रशिक्षण देणार असून प्रत्यक्ष सराव, तांत्रिक मार्गदर्शन व व्यवसाय उभारणीचे प्रशिक्षणही दिले जाणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी अनिल तांदळे यांनी आभार मानले. शहरातील जिल्हा कारागृहातही बंदिवानांसाठी संविधान वाचन करण्यात आले. तसेच जन शिक्षण संस्थेच्या जिल्ह्यातील सर्व केंद्रांमध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला.



''श्रीराम जय राम जय जय राम'' या जयघोषात नगरगोंदवले दिंडीचे प्रस्थान; प्रभाग २ मधील शिलाविहार येथून माजी नगरसेवक निखिल वारे, बिभीषण अनभुले, दिंडी चालक रेखा रिंगणे व वारकरी सहभागी होते. (छायाचित्र : विजय मते)

# हुतात्मा स्मारकात शहिदांना श्रद्धांजली

## लायन्स क्लब, घर घर लंगर सेवा, मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने अभिवादन

**अहमदनगर । रयत समाचार**

मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेल्या जवान आणि पोलीस अधिकारीकर्मचाऱ्यांच्या स्मृतींना उजाळा देत लायन्स क्लब ऑफ अहमदनगर, घर घर लंगर सेवा आणि मराठी पत्रकार परिषद यांच्या वतीने हुतात्मा स्मारक येथे पुष्पचक्र अर्पण करून व मेणबत्त्या प्रज्वलित करून श्रद्धांजली



वाहण्यात आली.

या अभिवादन कार्यक्रमास लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. संजय असनानी, घर घर लंगर सेवेचे हरजितसिंह वधवा, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य कोषाध्यक्ष मन्सूर शेख, लायन्स क्लबचे खजिनदार दिलीप कुलकर्णी, प्रकल्प प्रमुख धनंजय भंडारे, अमोल अडबल्ले, गोपाळ ढाकणे, सुभाष रणदिवे, राजेश बत्तीन आदी उपस्थित होते.

२६/११ च्या भीषण हल्ल्यात नागरिकांचे प्राण वाचवण्यासाठी पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि सुरक्षा दलातील जवानांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून बलिदान दिले. त्यांच्या अद्वितीय साहस आणि कर्तव्यपरायणतेला या कार्यक्रमात मानवंदना देण्यात आली.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

## सचिन गुजर यांना जबर मारहाण निषेधार्थ
# काँग्रेसचे आंदोलन तर महायुतीचे आत्मक्लेष आंदोलन

**श्रीरामपूर – सलीमखान पठाण**

छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रचार सभेतून एकेरी उल्लेख केल्याबद्दल जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन गुजर यांना शिव प्रहार संघटनेचे चंदू आगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी जबर मारहाण केली.याचा निषेध म्हणून काँग्रेस पक्षाने नगरपालिका समोर दिवसभर आंदोलन केले तर सचिन गुजर यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करावी या मागणीसाठी भाजप राष्ट्रवादी युतीच्या पदाधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ आत्मक्लेष आंदोलन केले. एकीकडे देशात संविधान दिन साजरा होत असताना श्रीरामपुरात मात्र हा दिवस काल आंदोलनाने साजरा झाला. नगरपालिका निवडणुकीचा प्रचार सध्या शिगेला पोहोचला असून शहरात वार्डावरडातून प्रचार सभा,कॉर्नर मिटींग होत आहेत.या सभांना मतदारांचा उत्तम प्रतिसाद देखील मिळत आहे.

काँग्रेसची अशीच एक सभा परवा झाली होती. त्या सभेत बोलताना छत्रपतींच्या पुतळ्यावरून सचिन गुजर यांनी शिवाजी महाराजांचा दोनदा एकेरी उल्लेख केल्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर झळकला होता. काल सकाळी सात वाजता गुजर हे नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉकला जाण्यासाठी आपल्या घराबाहेर पडले असता एका कार मधून आलेल्या चार जणांनी त्यांना बळजबरीने कार मध्ये घातले आणि बेलापूर रोडला गोखलेवाडी परिसरात नेऊन त्यांना मारहाण केली तसेच कान पकडून उठबशा काढायला लावल्या व मारहाण करून सोडून पसार झाले.ही वार्ता सकाळी शहरात पसरतात दररोज मॉर्निंग वॉक साठी जाणारे आमदार हेमंत ओगले व काँग्रेसचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार करण ससाणे व त्यांचे सहकारी थेट पोलीस स्टेशनला गेले व त्यांनी याबाबत गुन्हे दाखल करून गुन्हेगारांना अटक करण्याची मागणी केली.





सचिन गुजर यांना मारहाण झाल्यानंतर थोड्याच वेळामध्ये शिव प्रहार संघटनेचे चंदू आगे यांनी एक व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित करून या हल्ल्याची जबाबदारी घेतली.छत्रपती शिवाजी महाराजांसाठी आम्ही प्राण्यांची अवती द्यायला देखील तयार आहोत छत्रपतींचा अपमान सहन करणार नाही असे सांगून आमच्यावर गुन्हे दाखल करा आम्ही जामीन सुद्धा घेणार नाही असे सांगून केलेल्या महाराणीचे समर्थन केले.त्यानंतर हल्लेखोर स्वतः पोलीस स्टेशनला हजर झाल्याचे समजते.

त्यानंतर हे सर्वजण नगरपालिकेसमोर आले. तेथे त्यांनी आंदोलन चालू केले. जोपर्यंत गुन्हेगारांना अटक होत नाही तोपर्यंत हे आंदोलन चालू राहील आणि निवडणुकीचा प्रचार देखील करणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली. हळूहळू शहरातील काँग्रेसचे सर्व उमेदवार कार्यकर्ते त्या ठिकाणी जमा झाले व दहा वाजेपर्यंत मोठा जमाव त्या ठिकाणी तयार झाला. त्यावेळी अनेकांची भाषणे देखील झाली. आमदार हेमंत ओगले यांनी यावेळी बोलताना सांगितले की काँग्रेसच्या नगरसेवक पदाच्या तीन लोकांवर आतापर्यंत अशा पद्धतीने पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.राजकीय दबावापोटी हे प्रकार घडत आहेत याचा आम्ही तीव्र निषेध करतो.

ज्येष्ठ काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी देखील या ठिकाणी भेट देऊन घटनेचा निषेध केला.सचिन गुजर यांना झालेल्या या महाराणीचा शहरातील सर्वच थरातून निषेध व्यक्त करण्यात आला. इकडे भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस युतीचे सर्व पदाधिकारी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव अविनाश आदिक,भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार श्रीनिवास बिहानी,जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दीपक पटारे व इतर सर्व पदाधिकारी हे साडेअकरा वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर एकत्र आले व तेथे त्यांनी आत्म क्लेष आंदोलन चालू केले.छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख करणाऱ्या काँग्रेसचे अध्यक्षाला अटक करून त्याच्यावर गुन्हे दाखल करा झालेली कृती योग्य आहे असे यावेळी सांगण्यात आले. यामध्ये पालकमंत्र्यांना गोवण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या लोकांनी केला. परंतु या घटनेशी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा कोणताही संबंध नाही. गुजर यांनी केलेल्या केलेल्या कृतीबद्दल व्यक्त झालेली ही उत्स्फूर्त प्रतिक्रिया आहे असे मत दीपक पटारे यांनी व्यक्त केले. सकाळी झालेल्या या प्रकाराने दिवसभर मात्र शहरामध्ये प्रचार थांबला व दोन ठिकाणी आंदोलन झाल्याने दिवसभर तो चर्चेचा विषय होता. दरम्यान यापूर्वी श्रीरामपूर निवडणुकीच्या काळात अशा घटना कधीच घडल्या नाही मात्र आता नको ती कारणे पुढे करून अशा पद्धतीने पुढाऱ्यांना मारहाण होत असल्याने सर्वसामान्य नागरिक मात्र हवालदिल झाले आहेत.अशा पद्धतीने जर दहशत निर्माण होणार असेल तर निवडणुका निकोप वातावरणात कशा होणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमधून विचारला जात आहे.

# विकासकामांच्या जोरावर गोरे, शिंदे यांची प्रचारात आघाडी

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

"आमदार विक्रम पाचपुते आणि लोकनेते बबनराव पाचपुते यांनी आमच्यावर दाखविलेल्या विश्वासामुळेच प्रभाग क्रमांक १० मध्ये भाजपकडून माजी नगरसेवक प्रशांत गोरे व सामाजिक कार्यकर्त्या मीराताई शिंदे यांना उमेदवारी मिळाली आहे," असे मत उमेदवारांनी प्रचारसभेत व्यक्त केले.



माजी नगरसेवक प्रशांत गोरे यांनी आपल्या २०१९ ते २०२४ या कार्यकाळात जुना प्रभाग ९ आणि सध्याचा प्रभाग १० मध्ये रस्त्यांचे खडीकरण, डांबरीकरण, काँक्रीटीकरण, तसेच पेव्हर ब्लॉक बसविण्याची कामे मोठ्या प्रमाणात केली. प्रभागातील गटारलाईनचे काम, ओपन जिम, गार्डन, उद्यानांचे सुशोभीकरण यांसह नागरिकांच्या पाणी-लाईटसारख्या मूलभूत गरजांशी संबंधित अडचणी दूर करण्यासाठी त्यांनी कार्यतत्परता दाखवली.

प्रभागातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुन्हा एकदा संधी द्यावी, अशी विनंती प्रशांत गोरे व मीराताई शिंदे यांनी नागरिकांना केली. या आवाहनाला प्रभागातील नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# आदर्श विद्यालयात संविधान दिन साजरा

**नेवासा । विजय खंडागळे**

सोनई येथील आदर्श विद्या मंदिर प्राथमिक विद्यालयात काल बुधवार, ता. २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



या प्रसंगी मुख्याध्यापक ए. बी. दरंदले यांनी विद्यार्थ्यांना संविधानाची माहिती सोप्या आणि समजण्यासारख्या भाषेत दिली. "संविधान निर्मिती, नागरिकांना मिळालेले हक्क, कायद्याचे ज्ञान, सुरक्षा आणि संरक्षण याविषयी महत्त्वपूर्ण बाबी संविधानातून मिळतात. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जगासाठीचे योगदान महान आहे," असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे धडे दिले.

कार्यक्रमात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांच्या उपस्थितीत संविधानाचे वाचन करण्यात आले. संविधान दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना आपले विचार मांडण्याची संधी मिळावी यासाठी भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मुलांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला. स्पर्धेचे नियोजन श्रीमती गायवळ यांनी केले.

# गावागावात मोफत तपासणी, औषधोपचार, गंभीर रुग्णांना रेफरल सुविधा
## आत्मा मालिक हॉस्पिटलचा लोकाभिमुख उपक्रम

**कोपरगाव । किसन पवार**

ग्रामीण भागातील नागरिकांना घराजवळच दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आत्मा मालिक हॉस्पिटल, कोकमठाण यांनी 'फिरता दवाखाना, मोबाइल हॉस्पिटल सेवा' हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाची घोषणा आयोजित पत्रकार परिषदेत हॉस्पिटल चे प्रमुख डॉ. मयुर शिंदे यांनी केली.




कोकमठाण येथील आत्मा मालिक हॉस्पिटल हे अत्याधुनिक सुविधा, प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी, नर्सिंग स्टाफ, आयसीयू, एनआयसीयू, डिजिटल एक्स-रे, सोनोग्राफी, शस्त्रक्रिया विभाग, २४ तास आपत्कालीन सेवा, मेडिकल स्टोअर, लॅब तपासण्या अशा सर्व सोयींमुळे ग्रामीण भागातील रुग्णांचे विश्वसनीय आरोग्य केंद्र म्हणून ओळखले जाते. बाह्यरुग्ण विभागात जनरल मेडिसिन, बालरोग, सर्जरी, ऑर्थो तसेच साप्ताहिक स्पेशालिस्ट डॉक्टरांच्या भेटी नियमित सुरू असतात. यामध्ये आणखी एक पाऊल पुढे टाकत ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना तत्काळ व मोफत आरोग्यसेवा देण्यासाठी अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशी विशेष बस तयार करण्यात आली आहे. वैद्यकीय अधिकारी, नर्सिंग स्टाफ, परिचारक व प्रशिक्षित चालकासह ही बस दर आठवड्याला निश्चित वेळापत्रकानुसार गावागावात सेवा देणार आहे.

या मोबाइल हॉस्पिटलकडून मिळणाऱ्या प्रमुख मोफत सेवा मध्ये बीपी तपासणी, शुगर तपासणी, प्राथमिक उपचार, आवश्यक औषधांचे वितरण, तसेच गंभीर रुग्णांना आत्मा मालिक हॉस्पिटलमध्ये रेफरलसह पुढील उपचारांची व्यवस्था केली जाणार आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पात्र रुग्णांना उपचार पूर्णपणे मोफत उपलब्ध राहतील.

गावनिहाय मोबाइल हॉस्पिटल बस खालीलप्रमाणे ठरलेल्या दिवशी गावांत भेट देणार आहे, सोमवार रुई १० ते १२, शिंगव १२.३० ते २.३०, पुणतांबा ३ ते ८.३०, मंगळवार जवळके १० ते १२, बहादरपूर १२.३० ते २.३०, सायाळे ३ ते ८.३० बुधवार खंबाळा १० ते १२, धोत्रे १२.३० ते २.३०, खोपडी ३ ते ५.३० गुरुवार सावळीविहिर १० ते १२, कनकुरी १२.३० ते २.३०, नांदुर्खी ३ ते ५.३० शुक्रवार पिंपळवाडी १० ते १२, एकरुखे १२.३० ते २.३०, रामपूरवाडी ३ ते ८.३० विवार दहेगाव/पिंपळस/केलवड १० ते १२, खडकेवाके १२.३० ते २.३०, निर्मळ पिंपरी ३ ते ८.३०दुर्गम व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी ही सेवा वरदान ठरणार असल्याचे मत ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी यांनी व्यक्त केले. तपासणीत गंभीर आजार आढळल्यास रुग्णांना हॉस्पिटलमध्ये अत्यल्प दरात किंवा शासकीय योजनांतर्गत मोफत उपचार मिळतील, असेही त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकाने या मोफत, दर्जेदार आणि तत्काळ आरोग्यसेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. मयुर शिंदे यांनी शेवटी केले.

**दैनिक रयत समाचार**
**अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...**
**त्वरित नियुक्त करणे आहेत**
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा
अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
**आम्ही काय देणार**
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

## किस्से निवडणुकीचे...

**सलीमखान पठाण**

# उमेदवार हवालदिल, मतदार संभ्रमात




श्रीरामपूर – नगरपालिकेच्या निवडणुकीने आता चांगलाच जोर धरला आहे; त्यामुळे प्रत्येक प्रभागांमध्ये मतदारांना आपले करण्यासाठी उमेदवार वेगवेगळ्या युक्त्यांचा वापर करीत आहेत. आपले नातेवाईक मित्र यांना दुसऱ्या प्रभागातून आपल्या भागात बोलावून मतदारांच्या गाठीभेटी घेण्यासाठी उद्युक्त केले जात आहे. प्रत्येक भागामध्ये काही सामाजिक प्रतिष्ठित लोक आहेत त्यांना भेटण्यासाठी व त्यांचे संबंध पाहून त्यांना वेळ घालण्यासाठी सर्वच उमेदवार त्यांच्याकडे चकरा मारीत आहेत. त्यामुळे अशा सामाजिक लोकांची मोठी कोंडी होत आहे. हा येऊन गेला तो येऊन गेला अशी चर्चा त्यांच्या बाबत होत असल्याने नेमकं काय करावे, असे त्यांना झाले आहे. काही उमेदवार रात्री उशिरा संपर्क करून त्यांना पाठिंबा मागत आहेत. काही ठिकाणी अपक्ष उमेदवार सुद्धा हिरीरीने विचार करताना दिसत आहेत. काही प्रभागांमधून अपक्षांनी सुद्धा जोर लावला आहे. आता हे अपक्ष उमेदवार कोणत्या उमेदवाराचा पत्ता कट करणार आणि कोणाला फायदेशीर ठरणार याबाबतही लोक तर्कवितर्क करताना दिसत आहेत. उमेदवारांना मतदारांशी संपर्क करताना फारच जपून बोलावे लागत आहे. कारण कोणता मतदार कोणाच्या बाजूने आहे याचा ठाव अजून लागत नाही. त्यामुळे तो दुखावला जाणार नाही याची काळजी उमेदवार घेत आहेत तर मतदार देखील प्रत्येकाला हो तुम्हीच निवडून येणार. आम्ही तुमचेच काम करीत आहोत असे सांगून उमेदवारांना विश्वास देत आहेत. एकूणच या निवडणुकीमध्ये उमेदवार हवालदिल तर मतदार मात्र संभ्रमात असल्याचे दिसून येत आहे. काही उमेदवारांचे उत्साही कार्यकर्ते आणि प्रचार करणारे लोक यांच्या वागण्या आणि बोलण्याचा परिणाम देखील मतदारांवर होणार असल्याचे चित्र दिसत आहे.

# परेश मुजगुले यांचे निधन

**कोपरगाव । किसन पवार**

पोहेगाव येथील रहिवासी परेश चांगदेव मुजगुले (वय ६४) यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निकटवर्तीय आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) जिल्हा सरचिटणीस सचिन मुजगुले यांचे ते थोरले बंधू होते. त्यांच्या पश्चात एक बहिण, पत्नी आणि दोन मुली असा परिवार आहे. स्व. परेश मुजगुले हे मितभाषी व संयमी स्वभावाचे होते. त्यांचे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निकटचे संबंध होते. राज्यातील वरिष्ठ नेतृत्व व वर्तुळात त्यांचा सततचा समन्वय आणि संपर्क टिकून होता. त्यांचे वडील स्व. सी. एस. मुजगुले यांनी अगस्तीसह अनेक कारखान्यांच्या उभारणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. या कामामुळे माजी केंद्रीय मंत्री खा. शरद पवार आणि मुजगुले कुटुंब यांच्यात दृढ संबंध प्रस्थापित झाले होते. हे ऋणानुबंध स्व. परेश मुजगुले यांनी जपले, तसेच पुढील पिढीनेही ते निष्ठेने जपले.



# दत्त जयंती उत्सवानिमित्त ४२ वा अखंड हरिनाम सप्ताह

**नगर तालुका । रयत समाचार**

नेप्ती येथील चौरे मळ्यातील दत्त मंदिरात दत्त जयंतीनिमित्त श्री गुरुदेव दत्त कृपेने आणि वै. धुंडा महाराज यांच्या आशीर्वादाने दत्त सेवा मंडळ व चौरे परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने ४२ वा अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. श्री दत्त जयंती उत्सव, गुरुचरित्र व ज्ञानेश्वरी पारायणासह हा धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

सप्ताहाचे आयोजन शुक्रवार, ता. २८ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले असून, दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत कीर्तने व धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. शुक्रवार, ता. २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता ह.भ.प. देवराम फुले महाराज नेप्ती यांच्या हस्ते कलश स्थापना व श्री दत्त चरित्र पारायणाने सप्ताहाची सुरूवात होईल. त्याच दिवशी रात्री ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. माधवबाबा इंगोले आळंदी देवीची यांचे कीर्तन होणार आहे.

शनिवार, ता. २९ नोव्हेंबर रोजी ह.भ.प. महंत रामगिरी महाराज (येळेश्वर संस्थान) यांचे कीर्तन, तर रविवार, ता. ३० नोव्हेंबर रोजी ह.भ.प. हरिभाऊ महाराज भोंदे (पिंपळगाव माळवी) यांचे कीर्तन होणार आहे. सोमवार,



१ डिसेंबर रोजी ह.भ.प. श्रीकृष्णकृपांकित विकासानंदजी महाराज मिसाळ (संत पंढरी, पिंपळगाव वाघा), मंगळवार, २ डिसेंबर रोजी ह.भ.प. देविदास महाराज अडभाई (चांदा) आणि बुधवार, ३ डिसेंबर रोजी ह.भ.प. सूर्यदर्शन महाराज कारखेले (पाथर्डी) यांची कीर्तने पार पडणार आहेत. या सर्व दिवसांत विविध भजन मंडळे आपली सेवा देणार आहेत.

दत्त जयंतीनिमित्त गुरुवार, ता. ४ डिसेंबर रोजी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ४ वाजता ह.भ.प. मुकुंदकाका महाराज जाटदेवळे यांचे दत्त जन्माचे कीर्तन, तर रात्री ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. राऊत दादा महाराज पिंपळा यांचे कीर्तन होणार आहे. याच दिवशी ६ वाजता पालखी सोहळा, दिंडी, भक्तनाम सप्ताह आणि भजनसेवा उत्साहात पार पडणार आहे.

सप्ताहाचा समारोप शुक्रवार, ता. ५ डिसेंबर रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. बाळकृष्ण महाराज कांबळे (ताहराबाद) यांच्या काल्या कीर्तनाने होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे. सप्ताहभर ह.भ.प. शंकर महाराज कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ८ ते ११ आणि दुपारी २ ते ४ या वेळेत ज्ञानेश्वरी पारायण, पहाटे ४ वाजता परळीकर भजनी मंडळाचे काकडा भजन, तसेच दररोज सकाळी ८ वाजता विष्णू सहस्त्रनाम आणि १० वाजता गाथा भजन होणार आहे.या पवित्र सप्ताहाचा लाभ मोठ्या संख्येने भाविकांनी घ्यावा, असे आवाहन दत्त सेवा मंडळ व चौरे परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पडद्यावरील ही मॅन काळाच्या पडद्याआड

१९६० ते १९८० हा काळ हिंदी चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ समजला जातो. या सुवर्णकाळाने हिंदी चित्रपट सृष्टीला एका पेक्षा एक असे अनेक महान कलाकार दिले. या कलाकारांनी आपल्या अभिनयाने हिंदी चित्रपट सृष्टीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आता मात्र या सुवर्ण काळाचे साक्षीदार असलेले महान कलाकार एक एक करून आपल्याला सोडून चालले आहेत. असेच एक महान कलाकार ज्यांनी आपल्या अभिनयाने आणि देखणेपणाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले ते हिंदी चित्रपट सृष्टीतील एक महान कलाकार धर्मेंद्र हे ही प्रेक्षकांना कायमचे सोडून गेले. अभिनेते धर्मेंद्र यांनी सोमवारी, २४ नोव्हेंबर रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी वृद्धापकाळाने अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर एकूणच मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली. ८ नोव्हेंबर १९३५ रोजी जन्मलेल्या धर्मेंद्र यांनी जवळपास पाच दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना मोहित केले. १९६० साली अभिनय क्षेत्रात पदार्पण केलेल्या धर्मेंद्र यांनी जवळपास ३०० हून अधिक चित्रपटात भूमिका केल्या . दिल भी तेरा हम भी तेरे हा त्यांचा पहिला चित्रपट. त्यांच्या पहिल्याच चित्रपटाला चांगले यश मिळाले. राजबिंडा चेहरा आणि मोहक हास्य आणि पिळदार शरीरयष्टी यामुळे त्यांना अनेक रोमँटिक भूमिका मिळाल्या. कारकिर्दीच्या सुरुवातील एक रोमँटिक हिरो म्हणून त्यांनी मोठा पडदा गाजवला. मीना कुमारी, सायरा बानू, शर्मिला टागोर, आशा पारेख, माला सिन्हा, परवीन बाबी, हेमा मालिनी, रीना रॉय, राखी, जया प्रदा या त्या काळातील सर्व मोठ्या अभिनेत्रींसोबत त्यांनी स्क्रीन शेअर केली. पुढे त्यानी ॲक्शनपटात भूमिका केल्या. १९७६ ते १९८४ या काळात त्यांनी अनेक त्यांनी ॲक्शनपट केले. धर्मेंद्र मोठ्या पडद्यावर गुंडांबरोबर नेहमीच दोन हात करत म्हणून त्यांची गरम – धरम आणि ही मॅन अशी ओळख निर्माण झाली. ही मॅन ही बिरुदावली तर त्यांना कायमची चिकटली म्हणूनच त्यांच्या निधना नंतर पडद्यावरचा ही मॅन काळाच्या पडद्याआड गेला अशी बातमी टीव्ही चॅनलवर झळकली. धर्मेंद्र यांनी त्या काळातील सर्व महान दिग्दर्शकांसोबत काम केले. बिमल रॉय, जे पी दत्ता, मोहन कुमार, राजकुमार कोहली, राज खोसला, रमेश सिप्पी या दिग्दर्शकांनी त्यांना आपल्या चित्रपटात नेहमीच संधी दिली. अर्जुन हिंगोरानी यांच्या जवळपास सर्व चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या. हकिकत, ममता, अनुपमा, आये दीन बहार के, मेरे हमदम मेरे दोस्त, इज्जत, आँखें, सत्यकाम, आया सावन झुमके, जीवनमृत्यू, मेरा गाव मेरा देश, सीता और गीता, यादोंकी बारात, चुपके चुपके, शोले, धरमवीर, ब्लॅकमेल, जुगणू, कलाकार, दिल्लगी, द बर्निंग ट्रेन, राम बलराम, गुलामी, हुकूमत, बटवारा, क्षत्रिय, जॉनी गद्दार हे आणि यासारखे त्यांनी अभिनय केलेले अनेक चित्रपट गाजले त्यातील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. त्यांच्या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय ठरली. त्यांनी अभिनय केलेल्या शोले या चित्रपटाने तर इतिहास घडवला. या चित्रपटात त्यांनी साकारलेल्या वीरू या पात्राने तर जवळपास चार पिढ्यांवर अधिराज्य गाजवले. शोले आणि त्यातील जय वीरू याशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहासच पूर्ण होऊ शकत नाही. शोले चित्रपटाची शूटिंग चालू असतानाच ते हेमा मालिनीच्या प्रेमात पडले आणि पुढे दोघांनी लग्न केले. अभिनेते धर्मेंद्र यांनी केवळ हिंदीच नव्हे तर पंजाबी चित्रपटातही भूमिका केल्या. त्यांनी एका मराठी चित्रपटातही भूमिका केली. अभिनेते धर्मेंद्र यांनी काही चित्रपटाची निर्मितीही केली. सनी देवल आणि बॉबी देवल या आपल्या मुलांसाठी त्यांनी अनुक्रमे बेताब आणि बरसात या चित्रपटांची निर्मिती केली. अभय देवल या आपल्या भाच्यासाठीही त्यांनी सोचा न था या चित्रपटाची निर्मिती केली. पुढे त्यांनी राजकारणातही प्रवेश केला. २०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राजस्थान मधील बिकानेर मधून भाजप कडून निवडणूक लढवली आणि जिंकली पण राजकारण हा आपला प्रांत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणातून निवृत्ती स्वीकारीत पुन्हा आपला मोर्चा अभिनयाकडे वळवला. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. २०१२ साली भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांना गौरविले. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ चित्रपट सृष्टीवर आणि प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा हा महान कलाकार प्रेक्षकांना सोडून गेला. त्यांचे जाणे अकाली नव्हते तरीही त्यांचे जाणे प्रेक्षकांसाठी चटका लावून जाणारे ठरले. अभिनेते धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# सगळ्यांची खावी पोळी आणि मनाला येईल त्याचीच वाजवावी टाळी

## पाथर्डी नगरपरिषद निवडणुकीत मतदारांचा अजब ट्रेंड

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी अभय आव्हाड यांच्या उमेदवारी अर्जावरचं मळभ हटताच, मतदारांत वेगळंच चैतन्य निर्माण झालं आहे. मंगळवारपर्यंत जाणवत असलेली मरगळ झटकली गेली असून प्रचारात चुरस निर्माण झाली आहे. आव्हाड जोमाने कामाला लागले असल्याने मतदारांची सौदेबाजीची अपेक्षाही वाढीस लागली आहे. आज बुधवारी, एका प्रभागातील दोन मतदार एकमेकांच्या जवळून जात असताना, त्यातील एकाने दुसऱ्याला विचारले, ''अरे तुझ्यापर्यंत काही आलं की नाही ?'' हा शब्द परवलीचा वाटल्याने त्यांना बोलतं केलं असता वेगळंच वास्तव समोर आलं. तसं त्यात नवीन काही नव्हतं, पण या विषयावर त्यांना बोलतं केलं असता त्यांनी सांगितलं की, एरव्ही आपल्याला कोण विचारतं... हीच तर खरी वेळ आहे पदरात काहीतरी पाडून घेण्याची. घेतलं तरी विकास होतो आणि नाही घेतलं तरी विकास होतोच...शहराचा विकास होत असला तरी, अप्रत्यक्ष उमेदवारांचाही विकास होत असतोच.



उपरोक्त प्रस्तावनेतील मतदारांचं म्हणणं ऐकल्यावर अंतर्मुख व्हायला झालं... गेल्या पंचवार्षिकला जे उमेदवार नगर परिषदेत निवडून गेले, त्यांच्यापैकी अनेक उमेदवारांची आर्थिक स्थिती सुधारल्याचं वास्तव समोर असल्याने जर मतदारांची अशी धारणा होत असेल तर त्यांच्या संवादात काहीही गैर नव्हतंच... कुणाही पुढाऱ्यांनी कितीही सोज्वळ असल्याचा दावा केला तरी सर्वसामान्य माणसाला हे कळून चुकलं आहे की, उजळ माथ्याने झटपट श्रीमंत व्हायचं असेल तर राजकारण हेच एकमेव प्रतिष्ठित क्षेत्र आहे. म्हणूनच कदाचित, प्रख्यात ताओवादी युआंग झू यांनी म्हटलं आहे की, राज्यकर्ते आनंदी असतील तर जनता नेहमीच दुःखी असेल. निर्लज्ज माणसंच श्रीमंत होतात आणि बोलघेवडी माणसं अधिकारी. छोटे दरोडेखोर तुरुंगात असतात आणि मोठे दरोडेखोर राज्यकर्ते होतात. त्यांच्या दारात तथाकथित बुद्धिवान हात जोडून उभे असतात. उपरोक्त मतदारांनी व्यक्त केलेली भावना याच व्यवस्थेकडे अंगुलीनिर्देश करते.

गेल्या सहा-सात वर्षांत पाथर्डी शहरात अनेक विकासकामे झाली. यापैकी काही कामांचा दर्जा उत्तम असला तरी अनेक विकासकामे आज शोधूनही सापडणार नाहीत. त्यामुळे, मतदारांची अशी धारणा होत असेल तर त्याला भ्रष्ट व्यवस्थाच सर्वस्वी जबाबदार आहे. दोन- तीन पिढ्यांपूर्वी अनेक राज्यकर्त्यांची आर्थिक स्थिती दयनीयच असल्याचं वास्तव आहे. आजच्या पिढीतील अनेक जणांचे आजी-आजोबा हयात असतील तर त्यांना त्यांच्याकडून कधी ना कधी तरी हे ऐकायलाही आलं असेल. त्यामुळे, प्रत्येक प्रस्थापित राज्यकर्ते त्यांच्या उच्चशिक्षित अपत्यांच्या बाबतीत हेच बोलताना आढळतात की, आमच्या मुलाने नोकरी केली असती तर तो कोट्याधीश झाला असता. परंतु, जनतेच्या कल्याणासाठी त्याने नोकरी न करता जनसेवेचा मार्ग निवडला. असं असलं तरी एकाही प्रस्थापित राज्यकर्त्याचा वारसदार कधीही नोकरी करत नाही. एखाद्याला दोन-तीन अपत्ये असले तरीही त्यापैकी सहसा कुणीही नोकरी करत नाही.

ठराविकच मतदार पैसे घेऊन मतदान करत नाही तर अगदी पाचआकडी पगार घेणारे नोकरदारही मतदान करण्यासाठी पैसे घेतात, हे वास्तव आहे. चंगळवादी मतदार तर फक्त खाण्यापिण्यासाठीच राज्यकर्त्यांच्या मागेपुढे फिरत असतात. मध्यमवर्गीय, कनिष्ठ मध्यमवर्गीय व उच्च मध्यमवर्गीय मतदार तर मतदान करण्याच्या भानगडीतही पडत नाही. हेच भारतीय लोकशाहीचं व्यवच्छेदक लक्षण आहे. मतदान करणारा मतदार हा सर्वसामान्य वर्गातीलच असतो. तोच मोठ्या प्रमाणात विकलाही जातो आणि भरडलाही जातो. नेत्यांनाही जनतेची नस अचूक सापडली असल्याने तेही समाज सुधारण्याच्या फंदात पडत नाहीत. कारण, त्यांनाही त्यांची यंत्रणा राबविण्यासाठी कच्चा माल याच वर्गातून उपलब्ध होतो. विकास विकास म्हणतात तो फक्त सत्तेच्या परिघातील कार्यकर्ते व ठेकेदारांचाच होतो. परंतु, सर्वसामान्यांच्या पोरा-टोरांच्या हे लक्षात येत नाही. नेत्याने सेल्फी काढला तरी ते खूष होतात आणि पुढच्या निवडणुकीची वाट पाहतात. यातूनच सगळ्यांची पोळी खाण्याचा ट्रेंड पडला आहे.

# सत्तेत असू वा नसू, सदैव समाजाबरोबरच – विवेक कोल्हे

**कोपरगाव । किसन पवार**

''सत्तेत असू अथवा नसू समाजाबरोबरचा आमचा प्रवास कधीही थांबत नाही,'' अशा शब्दांत युवानेते विवेक कोल्हे यांनी प्रभाग क्रमांक १३ मधील सभेत नागरिकांना संबोधित केले. कोपरगाव नगरपालिकेच्या निवडणुका जवळ आल्यानंतर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाला स्पष्ट बहुमत द्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सभेत बोलताना त्यांनी स्व. शंकरराव कोल्हे यांच्या शांतता, सामाजिक ऐक्य आणि सौहार्द जपणाऱ्या कार्याचा उल्लेख करत, ''बुद्ध मूर्ती, अण्णाभाऊ साठे पुतळा, आंबेडकर पुतळा या सर्व उभारणीतून कोपरगावची सांस्कृतिक परंपरा अधिक मजबूत झाली आहे,'' असे सांगितले.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ४ कोटींच्या वैद्यकीय मदतीची सुविधा नागरिकांना मिळवून दिल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच प्रभागातील माऊली मंगल




कार्यालयाचे काम तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी सभेत जाहीर केले. ''इतरत्रची मंगल कार्यालये सर्वसामान्यांना परवडत नाहीत; हे कार्यालय जनसामान्यांच्या सोयीसाठीच उभे राहत आहे,'' असेही ते म्हणाले. गेल्या काही वर्षांत जाणूनबुजून दोन समाजांना भडकवण्याचे प्रयत्न होत असल्याचे त्यांनी नमूद केले. ''कोल्हे कुटुंबाने कधीही जातीय राजकारण केले नाही. समाजात शांतता राखणे हीच आमची परंपरा आहे,'' असे त्यांनी ठामपणे सांगितले.

२०१९ च्या पराभवानंतरही समाजकार्यातून पाऊल मागे घेतले नाही, याची आठवण करून देताना त्यांनी ''आरिफ कुरेशी यांना उपनगराध्यक्ष करून दीर्घकाळ प्रतिनिधित्व न मिळालेल्या समाजाला न्याय दिला,'' अशी माहिती दिली. स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी केलेल्या सकारात्मक कामांचीही त्यांनी थोडक्यात उजळणी केली.

पराग संधान यांनी कठीण काळात केलेल्या मदतीचा आणि कोरोना महामारीच्या काळात युवकांनी चालवलेल्या 'मावळा ग्रुप'च्या उपक्रमांचा त्यांनी विशेष गौरव केला. मुस्लिम समाजाच्या सर्व उत्सवकार्यक्रमात कोल्हे कुटुंब उपस्थित राहत असल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

त्यांच्या सभेच्या शेवटी दिलेल्या ग्वाहीने वातावरण उत्साहात दणाणून गेले ''प्रभाग क्रमांक १३ मध्ये आमचे उमेदवार विजयी झाले, तर येथे एकही दंगल नाही तर फक्त विकास होईल.'' नागरिकांनी या ग्वाहीला टाळ्यांच्या कडकडाटात जोरदार प्रतिसाद दिला.

# न्यू आर्ट्सच्या विद्यार्थ्यांची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड




**शेवगाव । नरहरी शहाणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पार पडलेल्या आंतर विभागीय मैदानी स्पर्धेत ४०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगावचा खेळाडू अंकित कृष्णप्रकाश गुप्ता (M.Com) याने सुवर्णपदकाची कमाई केली. त्याची राजीव गांधी विद्यापीठ, कर्नाटक येथे होणाऱ्या ऑल इंडिया आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली. दरम्यान, शिर्डी येथे पार पडलेल्या आंतर विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत न्यू आर्ट्स कॉलेजची विद्यार्थिनी कु. दुर्गा तात्यासाहेब डोखळे (T.Y. BCS) हिचीही आंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या दोन्ही विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल कामगिरीबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे, तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. दादासाहेब मुरलीधर लोखंडे यांनी खेळाडूंना प्रशिक्षण व मार्गदर्शन केले.

# पुस्तकावर बोलू काही' उपक्रमात तु.सी. ढिकले यांचा गौरव;

## मानपत्र, पोट्रट आणि उपरण्याने सन्मान



**नाशिक । रयत समाचार**

गिरणा गौरव प्रतिष्ठान आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' या उपक्रमाने २०० व्याख्यानांचा महत्वपूर्ण टप्पा पूर्ण केला असून, यानिमित्त पहिल्या १०० व्याख्यात्यांचा विशेष सत्कार सोहळा औरंगाबाद येथील मु.शं. औरंगाबादकर सभागृहात दिमाखात पार पडला.

या उपक्रमात पूर्वी 'सत्य असत्याशी मन करा रे ग्वाही' या पुस्तकावर तु.सी.ढिकले यांना व्याख्यान देण्याचा मान मिळाला. अनेक साहित्यिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गिरणा गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश पवार होते. रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष भगिरथ शिंदे, प्राचार्य हरीष आडके, सावानाचे अध्यक्ष प्रा. दिलिप फडके, नामको बँक संचालक प्रकाश दायमा यांच्या हस्ते तु.सी.ढिकले यांच्यासह इतर व्याख्यात्यांचा सत्कार करण्यात आला.

या सत्कारात विशेष आकर्षण ठरले ते साहित्यिक किरण भावसार यांनी तयार केलेल्या सुंदर पोर्ट्रेट्सची दिलेली फ्रेम. पारंपरिक टोपी, उपरणे यांसह ही खास स्मृतीचिन्हे देऊन सर्व साहित्यिकांचा सन्मान करण्यात आला. गिरणा गौरव प्रतिष्ठानने आपल्या उपक्रमाद्वारे तयार केलेल्या या साहित्यिक मंचामुळे अनेक लेखक, कवी आणि अभ्यासक एका छताखाली येऊन जोडले गेले. उपक्रमात सहभागी झालेल्या पहिल्या १०० व्याख्यानांवर आधारित माहितीपूर्ण पुस्तकाचेही प्रकाशन यावेळी झाले. संपूर्ण सोहळा उत्साह, आनंद आणि साहित्यिक एकोप्याने भरलेला होता.

# गांजा तस्करीप्रकरणी ६ जणांना अटक

**काटोल । रयत समाचार**

नागपूर जिल्ह्यातील काटोल येथे अमली पदार्थविरोधी पथक (एनडीपीएस सेल) आणि काटोल पोलिसांनी संयुक्त कारवाई करत तब्बल ३४ किलो गांजा जप्त केला. या कारवाईत भाजप युवा मोर्चाच्या तालुका अध्यक्षासह सहा जणांना अटक करण्यात आली असून, आणखी काही जणांचा सहभाग असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे स्थानिक आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी धंतोली भागातील एका घरातील खोली नारळ व्यवसायासाठी घेतली होती. मात्र खोलीत संशयास्पद हालचाल सुरू असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सोमवारी पहाटे छापा टाकला. नारळ विक्रीचा व्यवसाय दाखवून त्याच ठिकाणी गांजाचा साठा आणि पुरवठा चालवला जात होता.

# इसळक येथे रस्ता काँक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन उत्साहात




**नगर तालुका । रयत समाचार**

इसळक येथे ग्रामपंचायत कार्यालय ते गणपती मंदिर या रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन मोठ्या उत्साहात पार पडले. नगरपारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते भूमिपूजन सोहळा संपन्न झाला.

सन २०२५२६ या आमदार निधीतून या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यास मंजुरी देण्यात आली. भूमिपूजनावेळी ग्रामस्थ प्रतिनिधींनी इसळक गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक विविध कामांसाठी पुढील काळात निधी उपलब्ध करून देण्याची विनंती आमदारांकडे केली. त्यावर आमदार काशिनाथ दाते यांनी इसळक गावाच्या विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य आणि निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिले.

या प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समिती, पारनेरचे सभापती प्रशांत गायकवाड, दिलीप दाते, सुनील जाधव, चांगदेव चव्हाण, माजी सरपंच संजय खामकर, माजी सरपंच बाबासाहेब गेरंगे, किसन चव्हाण, तुकाराम गेरंगे, केशव गेरंगे, बाबूलाल शिंदे, विठ्ठल चव्हाण, गोवर्धन कोतकर, चंद्रभान पोमणे, नामदेव गेरंगे, ह.भ.प. गिरधरी रोकडे, गोरख मोरे, शामराव महांडुळे, सतीष गेरंगे, नानाभाऊ नरसाळे, रवी खामकर, अजय गेरंगे, अतुल गेरंगे, भानुदास गेरंगे, गोवर्धन गेरंगे, जालिंदर गेरंगे, आनंदा गेरंगे, अशोक गेरंगे, गोरख आढाव, ग्रामसेवक सुभाष कापसे, अक्षय गेरंगे, प्रमोद गेरंगे, उद्धव शिंगाडे, योसेप (दादा) शिंदे, अशोक खामकर, संजय आढाव, जगदीश गेरंगे, संकेत शिंदे, विठ्ठल पोमणे, करण जाधव, अभी रोकडे, संदीप खर्से, सिद्धांत शिंदे, वैभव खंदारे, गोरख पोमणे, नितीन खंडागळे, प्रेम पोपळघाट, रोहन गेरंगे, सार्थक गेरंगे, मारुती पारकर, किरण चव्हाण, विकास चव्हाण यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.